**CENTRE FOR DISTANCE EDUCATION**

## From the Vice-Chancellor's Desk

To democratize higher education by providing access to large segments of the population including working people, women, army personnel and other adults who wish to acquire and upgrade their knowledge and skills through studies in various fields, Shivaji University established Centre for Distance Education (CDE) in the year 2008.

I am happy that Shivaji University Kolhapur (MS) through its Centre for Distance Education has widened the horizon of higher educational opportunities to all those who desire to pursue higher education by making available the self instructional Material specially prepared for them by our experts, arranging Contact Sessions in all Study Centres and providing pre and post registration counselling to distance learners. I am sure that our venture will help to serve the purpose of social inclusion of a large population which lies for various reasons distanced away from the portals of learning.

With my good wishes,

Prof. (Dr.) D. T. Shirke
Vice Chancellor

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र

सत्र-३ पेपर-४

## पैसा आणि बँकिंग

**(Money and Banking)**

सत्र-४ पेपर-६

## बँका आणि वित्तीय बाजारपेठा

**(Banks and Financial Markets)**

(शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून)

बी. ए. भाग-२ : अर्थशास्त्र

© कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
प्रथमावृत्ती : २०१४
बी. ए. भाग-२ अर्थशास्त्र पेपर ४ व ६ करिता
सर्व हक्क राखीव. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकारे पुनर्मुद्रण करता येणार नाही.

प्रती : ६००

■

प्रकाशक :
डॉ. व्ही. डी. नांदवडेकर
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

मुद्रक :
श्री. बी. पी. पाटील
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

ISBN- 978 93 80327-63-2

▲ दूरशिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ संबंधीची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर ४१६ ००४ (महाराष्ट्र राज्य) (भारत)





■ सल्लागार समिती ■

प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रा. (डॉ.) एम. एम. साळुंखे
माजी कुलगुरू,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

प्रा. (डॉ.) के. एस. रंगाप्पा
माजी कुलगुरू,
म्हैसूर विद्यापीठ, म्हैसूर

प्रा. पी. प्रकाश
अतिरिक्त सचिव,
विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली

प्रा. (डॉ.) शोभा येवले
शिव-गोविंद, प्लॉट नं. २,
१२४६/२ ए स्टेशन,
कोल्हापूर ४१६००१

प्रा. (डॉ.) आर. के. कामत
प्र. अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रा. (डॉ.) एस. एस. महाजन
प्र. अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्राचार्य (डॉ.) पी. आर. शेवाळे
प्र. अधिष्ठाता, मानव्यविद्या विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्राचार्या (डॉ.) श्रीमती एम. व्ही. गुळवणी
प्र. अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

डॉ. व्ही. डी. नांदवडेकर
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

श्री. जी. आर. पळसे
प्र. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

श्री. व्ही. टी. पाटील
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रा. (डॉ.) एम. ए. अनुसे (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखक | घटक क्रमांक |
|---|---|
| **सत्र–३ : पेपर–४** | |
| **प्रा. डॉ. धनाजी बा. इंगवले**<br>एम. एच. शिंदे आर्टस अ‍ॅण्ड कॉमर्स कॉलेज, तिसंगी | १, २ |
| **प्रा. डॉ. गणपत गोपाळ गायकवाड**<br>शिवराज महाविद्यालय, गडहिंग्लज | ३ |
| **प्रा. डॉ. आण्णा काका पाटील**<br>स. गा. म. कॉलेज (स्वायत्त), कराड | ४ |
| **सत्र–४ : पेपर–६** | |
| **प्रा. कैलास सुनिल पाटील**<br>विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर | १ |
| **डॉ. सोमनाथ विष्णु काळे**<br>विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर | २ |
| **डॉ. अनिल सत्रे**<br>एम. पी. पाटील महाविद्यालय, बोरगाव, ता. वाळवा, जि. सांगली | ३ |
| **प्रा. डॉ. एस. एस. पाटील**<br>कला व वाणिज्य महाविद्यालय, वडूज, जि. सातारा | ४ |

### ■ संपादक ■

**डॉ. काशिनाथ रामचंद्र तनंगे**
कला, वाणिज्य आणि विज्ञान
महाविद्यालय, गडहिंग्लज

**प्रा. डॉ. अनिल कृष्णराव वावरे**
छत्रपती शिवाजी कॉलेज (स्वायत्त),
सातारा.

# घटक – २

# भारतीय वित्तीय संस्था
## ( Financial Institutions in India )


२.० उद्दिष्टे

२.१ प्रस्तावना

२.२ विषय विवेचन

२.२.१ बिगर बँकींग वित्तीय संस्था : संकल्पना व प्रगती

२.२.२ म्युच्युअल फंड

२.२.३ भारतातील कर्ज कंपन्या

२.२.४ भारतीय आयात-निर्यात बँक

२.३ सारांश

२.४ महत्त्वाच्या संकल्पना

२.५ स्वयं अध्यायनासाठीच्या प्रश्नांची उत्तरे

२.६ सरावासाठी स्वाध्याय

२.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


## २.० उद्दिष्टे

प्रस्तुत घटकाच्या अभ्यासानंतर आपणास पुढील बाबींचे आकलन होईल.

१. भारतातील वितिय संस्थांची कार्यपद्धती समजावून घेता येईल.

२. भारतीय वित्तीय क्षेत्राची अर्थव्यवस्थेच्या विकासातील भूमिका लक्षात येईल.

३. भारतातील बँका व इतर वित्तीय संस्था यांची कामगिरी व आर्थिक विकास यांच्यातील कार्यकारणभाव लक्षात येईल.

## २.१ प्रास्ताविक

सध्याच्या काळात भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासातील एक महत्त्वाचा भागीदार म्हणून बँके इतर विकास वित्तीय संस्थांना एक पूरक घटक म्हणून बँकेतर वित्तीय संस्था हा एक उदयोन्मुख घटक गुंतवणूक व बचती या बाबतीत या बिगर बँकिंग वित्तीय संस्था महत्त्वाची भूमिका पार पाडतात. तसेच असं क्षेत्र व लहान कर्जदारांना कर्ज पुरवठादार म्हणून या संस्था काम करत असलेल्या दिसून येतात. वित्तीय क्षे वेगवान जागतिकीकरणाच्या व वेगवान औद्योगिक विकासाच्या काळात, वित्तीय क्षेत्र, उद्योग क्षेत्र उपक्रमांच्या जागतिकीकरणाच्या काळात भारतीय अर्थव्यवस्थेच्या वित्तीय तसेच इतर गरजा पूर्ण करण्या या संस्था वैविध्यपूर्ण कार्य करत आहेत. यादृष्टीने वित्तीय क्षेत्र वैविध्यपूर्ण व स्पर्धाक्षम बनविण्यासाठी वित्तीय संस्था व व्यावसायिक म्हणून हे क्षेत्र कार्य करत आहे.

## २.२ विषय विवेचन

### २.२.१ बिगर बँकिंग वित्तीय संस्था : संकल्पना व प्रगती

**बँकेतर वित्तीय संस्था**

कोणत्याही देशाच्या आर्थिक विकासाचा पाया हा त्या देशांमध्ये असलेल्या बँकिंग क्षेत्राच्या कार्यक्षम आधारित असतो. बँकिंग क्षेत्र हे वित्तीय बाजारपेठेमधील एक महत्त्वाचा भाग आहे. परंतु सद्य परिस्थि विचार केल्यास देशाच्या एकूण वित्तीय रचनेमध्ये बँकेतर वित्तीय संस्थांचे महत्त्वाचे दिवसेदिवस वाढत असल दिसून येते. देशाच्या आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत बँकाबरोबरच बँकेतर वित्तीय संस्थांचा सहभाग दे लक्षणीय प्रमाणात आहे.

बँकेतर वित्तीय संस्थांना बँकाप्रमाणे विस्तृत प्रमाणात जरी वित्तपुरवठा करता येत नाही. परंतु अ व्यवस्थेतील ठरावीक गरजू लोकांच्या अर्थपुरवठा विषयक गरजा पूर्ण करण्याच्या दृष्टीने त्यांची भूमिका महत्त्व आहे. या स्वरूपाच्या वित्तीय संस्था या बचतदार व गुंतवणूकदार यांच्यात मध्यस्थाची भूमिका पार पाडता अर्थव्यवस्थेतील लहान प्रमाणावरील बचतदार व गुंतवणुकीसाठी निधीची गरज असणारे कर्जदार यांच्याम समन्वय साधणे आवश्यक असते. त्यामुळे विविध उद्योग व्यवसायांचा विकास होण्यास मदत होते. या बँके वित्तीय संस्था लोकांकडून ठेवी स्वीकारतात व या ठेवींच्या माध्यमातून गरजू लोकांना आवश्यक कर्जपुरव करतात. या प्रकारच्या वित्तीय संस्थांमध्ये प्रामुख्याने विमा कंपन्या, गुंतवणूक कंपन्या, म्युच्युअल फंड, साह भांडवल संस्था, स्वयंसहायता गट योजना तसेच भाडे खरेदी वित्तीय संस्था इ.चा समावेश होतो.

बँकेतर वित्तीय संस्था सार्वजनिक क्षेत्रातील राष्ट्रीयकृत बँकांप्रमाणे विस्तृत बँकिंग व सेवापुरवठा कार्ये क नाहीत. परंतु कर्जपुरवठा करणे, गुंतवणूक करणे व इतर वित्तीय सेवा पुरविणे यांसारखी कार्ये करतात.

प्रस्तुत प्रकरणात आपण बँकेतर वित्तीय संस्थांची संकल्पना, अर्थ व भारतातील बँकेतर वित्तीय संस्थां प्रगती इ. चा अभ्यास करणार आहे.

## बँकेतर वित्तीय संस्थांची संकल्पना

बँकेतर वित्तीय संस्था ह्या प्रामुख्याने काही प्रमाणात बँकिंग कार्य करतात. परंतु त्यांच्याकडे बँकिंग व्यवसाय करण्याचा परवाना नसतो. बँकेतर वित्तीय संस्थांची व्यापक, सर्वसमावेशक व काटेकोर व्याख्या करता येणे शक्य नाही. परंतु बँकिंग आयोग व बँकिंग कायद्यान्वये त्याचा अर्थ स्पष्ट केला आहे.

**सन १९७२ च्या बँकिंग कायद्यानुसार** ज्या बँकांचे दायित्व कर्ज फेडण्यासाठी वापरले जात नाही अशा संस्थांचा आर्थिकदृष्ट्या विचार करून त्यांचा समावेश बँकेतर वित्तीय संस्थांमध्ये केला आहे. तसेच **१९६३ मधील बँकिंग व्यवसायाच्या कायद्यानुसार** सामान्य जनतेकडून ठेवी स्वीकारणाऱ्या तसेच बँकांप्रमाणे इतर कार्ये करणाऱ्या परंतु बँक म्हणून मान्यता नसणाऱ्या संस्था किंवा कंपन्यांना बँकेतर वित्तीय संस्था असे म्हटले आहे.

वरील व्याख्यावरून स्पष्ट होते की, बँकेतर संस्था या ठेवी स्वीकारतात व कर्ज देतात. ही त्यांची प्रमुख कार्ये असतात. परंतु या संस्थांची मालमत्ता कर्ज फेडण्यासाठी वापरता येत नाही. या संस्था व्यापारी बँकांप्रमाणे इतर ठेवी न स्वीकारता प्रामुख्याने मुदत ठेवी स्वीकारतात. या संस्थांची स्थापना बँकिंग कायद्यानुसार झालेली नसते. तसेच त्यांना रिझर्व्ह बँकेने बँक म्हणून कार्य करण्यास परवानगी दिलेली नसते. त्यामुळे त्यांना बँक म्हणून मान्यता देता येत नाही. म्हणून त्यांना बँकेतर वित्तीय किंवा बिगर बँकिंग वित्तीय संस्था असे म्हटले जाते.

बिगर बँकिंग वित्तीय संस्था या खूप कमी भांडवलाच्या साहाय्याने कार्य करतात. या संस्थांकडे असलेल्या भांडवलाचे प्रमाण एक लाख रुपयांपेक्षा कमी असते. ठेवीदारांना आकर्षित करण्यासाठी या प्रकारच्या संस्था ठेवींवर आकर्षक व्याज देतात व त्याद्वारे ते अधिकाधिक ठेव निधी संकलित करण्याचा प्रयत्न करतात. सामान्यतः व्यापारी बँकांच्या कार्यकक्षेत नसणाऱ्या किंवा व्यापारी बँकांनी कर्ज नाकारलेल्या कर्जदारांना या संस्था वित्त पुरवठा करतात. अशा वित्तीय संस्थांचा व्याजाचा दर व्यापारी बँकांच्या व्याजाच्या दरापेक्षा अधिक असतो. परंतु कर्ज तारण व कर्जासाठीचे कारण या बाबींकडे गांभीर्याने पाहिले जात नसल्याने या बँकांच्या कर्जाला अधिक मागणी असते.

## भारतातील बँकेतर वित्तीय संस्थांचा विकास

जगातील विविध विकसित देशांचा विचार केल्यास, त्या देशांमध्ये देखील बँकेतर वित्तीय संस्थांचा विकास मोठ्या प्रमाणात झालेला आहे. विकसनशील राष्ट्रांमध्ये देखील या बँकेतर वित्तीय संस्थांचे महत्त्व पटले असून भारत, जॉर्डन, कोरीया, मलेशिया यांसारख्या देशांमध्ये या प्रकारच्या वित्तीय संस्था मोठ्या प्रमाणात स्थापन होत आहेत. अशा संस्थांचा व्यवहारांसाठीचा खर्च अत्यंत कमी असतो. तात्काळ निर्णय घेण्याची क्षमता, ग्राहकांच्या समस्या समजून घेऊन त्यांकडे विशेष लक्ष देणे आणि तात्काळ सेवा पुरविणे यांसारख्या वैशिष्ट्यांमुळे या संस्थांचा विकास वेगाने होण्यास मदत झाली आहे. भारतात अनेक प्रकारच्या बँकेतर वित्तीय संस्था काम करतात.

बँकेतर वित्तीय संस्था करत असलेल्या कामाच्या स्वरूपावरून त्यांचे विविध प्रकारात वर्गीकरण केले जाते. त्यांचे प्रकार खालीलप्रमाणे :

१. कर्ज वित्त कंपनी

२. पायाभूत सुविधा वित्त कंपनी

३. मालमत्ता वित्तपुरवठा कंपनी

४. गुंतवणूक कंपनी

५. सूक्ष्म वित्त कंपनी

६. व्यवस्थाबद्ध गुंतवणूक कंपनी

७. अडत गुमास्ता कंपनी

८. पायाभूत कर्जनिधी कंपनी

भारतामध्ये बँकेतर वित्तीय संस्थांची सुरुवात १९६० च्या दशकाच्या अखेरीस झाली. १९७१ पर्यंत ही संख्या २०४१ व १९८० च्या अखेरीस त्यामध्ये २५०८५ पर्यंत वाढ झाली.

१९९१ साली भारतीय अर्थव्यवस्थेत नवीन आर्थिक सुधारणा स्वीकारल्या. या नवीन आर्थिक धोरणांतर्गत भारतात उदारीकरणाच्या धोरणाचा अवलंब करण्यात आला. त्यामुळे उपभोक्ते व उद्योजक यांचेकडून निधी व वित्तीय सेवांना मोठ्या प्रमाणात मागणी वाढली. त्यामुळे उदारीकरणाच्या धोरणाचा अवलंब केल्यानंतर सन १९९६ पर्यंत या संस्थांची संख्या ३९४५० इतकी झाली.

२०२० च्या दशकातील अलीकडच्या काही वर्षातील बँकेतर वित्तीय संस्थांनी केलेली प्रगती खालील-प्रमाणे स्पष्ट करता येईल.

**तक्ता : बँकेतर वित्तीय संस्थांच्या प्रगतीचे मुख्य निदर्शक (रक्कम अब्ज रु. मध्ये)**

| अ.क्र. | घटक | २०१४ | २०१५ | २०१६ | २०१७ |
|---|---|---|---|---|---|
| १. | भागभांडवल | ७३७ | ८५१ | ७६१ | ९२१ |
| २. | शिल्लक आणि राखीव निधी | २७२३ | ३११७ | ३०३३ | ३५३८ |
| ३. | सार्वजनिक ठेवी | १३१ | २०५ | २७१ | ३०६ |
| ४. | कर्ज | १०१४२ | १२२३७ | १२२६३ | १३७४८ |
| ५. | इतर | ७६६ | ८७५ | ९०४ | ११५१ |
| एकूण देयता व मालमत्ता | | १४४९९ | १७२८४ | १७२३१ | १९६७१ |

(पुढे चालू...)

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १. | कर्ज व अग्रीमे | १०७८२ | १२८७५ | १३१६९ | १४८४६ |
| २. | गुंतवणूक | २१५९ | २६०३ | २२५३ | २६७३ |
| ३. | रोख आणि बँकेतील शिल्लक | ५४८ | ६६८ | ५८५ | ७७८ |
| ४. | इतर | १०१० | ११३८ | १२२५ | १३७५ |
| **वित्तीय प्रमाण (% मध्ये)** | | | | | |
| १. | उत्पन्नाचे एकूण मालमत्तेशी प्रमाण | ११.८ | ११.६ | १२.४ | ११.७ |
| २. | खर्च-उत्पन्न प्रमाण | ५२.९ | ५२.१ | ५०.४ | ४९.४ |
| ३. | एकूण अनिष्पादित मालमत्ता व एकूण अग्रीमे प्रमाण | ३.९ | ४.१ | ४.५ | ५.० |
| ४. | निव्वळ अनिष्पादित मालमत्ता व एकूण अग्रीमे प्रमाण | २.५ | २.५ | २.५ | २.३ |
| ५. | समभागांवरील परतावा | ९ | १०.३ | ७.९ | ६.८ |

**Source :** Handbook of Statistics on the Indian Economy, RBI.

अलीकडच्या काही वर्षात बँकेतर वित्तीय संस्थांमार्फत केल्या जाणाऱ्या व्यवहारांचे स्वरूप झपाट्याने बदलत आहे. त्यामुळे ग्राहकांच्या व कर्जदारांच्या मागणीनुसार ठेवी गोळा करणे भाडे-खरेदी वित्त व्यवहारांच्या मुलभूत कार्याबरोबरच उद्योगांच्या मालमत्तांचे व्यवस्थापन, हुंड्यांची वटवणूक, प्रकल्पांसाठी वित्तपुरवठा यांसारखे नवीन व्यवहार करत आहेत. तसेच या प्रकारच्या संस्थांनी अलीकडच्या काळात शुल्क आधारित व्यवहारांवर अधिक लक्ष केंद्रित केले आहे. त्यामुळे त्यांच्या उत्पन्नात वाढ झाली आहे. या संस्थांना आता तीव्र स्पर्धा निर्माण झाली आहे. त्यामुळे या संस्था साधनांसाठी वित्तपुरवठा करण्याकडे व कमी जोखमीच्या किरकोळ व्यवहारांवर त्या अधिक भर देत असल्याचे दिसून येते.

**सरावासाठी प्रश्न १**

१. बँकेतर वित्तीय संस्थांची स्थापना .......... या कायद्यानुसार केली जाते.

(अ) आर.बी.आय. कायदा १९३४ (ब) बँकिंग नियमन कायदा १९४९

(क) कंपनी कायदा १९५६ (ड) प्रादेशिक ग्रामीण बँक कायदा १९७५

२. बँकेतर वित्तीय संस्था .......... ही कार्ये करतात.

(अ) कर्जे व अग्रीमे देणे (ब) रोखे खरेदी करणे

(क) समभागामध्ये गुंतवणूक करणे (ड) वरीलपैकी सर्व

३. ........... या मागणी ठेवी स्वीकारत नाहीत.

(अ) खाजगी क्षेत्रातील व्यापारी बँका (ब) बँकेतर वित्तीय संस्था

(क) सार्वजनिक क्षेत्रातील व्यापारी बँका (ड) विकास बँका

४. बँकेतर वित्तीय संस्थेचे स्वतःचे किमान भांडवल ........... रु. इतके असणे आवश्यक असते.

(अ) ५० लाख (ब) २ कोटी (ड) ३ कोटी (ड) ५ कोटी

५. ज्या बँकेतर वित्तीय संस्थेचे ७५% भांडवल पायाभूत सुविधांमध्ये गुंतवले जाते त्यास ........... असे म्हणतात.

(अ) गुंतवणूक कंपनी (ब) बिगर ठेवी कंपनी

(क) कर्ज कंपनी (ड) पायाभूत सुविधा कंपनी

## २.२.२ म्युच्युअल फंड

### प्रस्तावना

देशाचा आर्थिक विकास हा प्रामुख्याने भांडवल बाजाराचा विकास व विस्तार यावर अवलंबून असतो. भांडवल बाजाराचा विकास हा देशातील बचतीच्या दरावर अवलंबून असतो. भारतामध्ये लोकांकडील बचतीचा दर अधिक असूनदेखील लोकांना चांगला परतावा देणारे गुंतवणुकीचे विविध स्रोत माहिती नसलेने भारतीय भांडवल बाजाराचा वेगाने विकास झाला नाही. त्यामुळे बचत प्रामुख्याने बँक ठेवी, स्थावर मालमत्ता व सोने इ. कडे जास्त प्रमाणात वळत असल्याचे दिसून येते. बचतदारांना जर नियमितपणे आकर्षक परतावा देणारे, अधिकाधिक सुरक्षितता प्रदान करणाऱ्या गुंतवणुकीसंबंधी माहिती देऊन गुंतवणुकीसाठी अनुकूल वातावरण निर्माण केले तर भांडवल बाजारातील गुंतवणुकीचा वेग वाढेल. अशा परिस्थितीमध्ये म्युच्युअल फंडच्या विस्ताराला खूप वाव असल्याचे दिसून येते. म्युच्युअल फंडच्या माध्यमातून गुंतवणूक दारांना त्यांच्या गुंतवणुकीवर सातत्याने योग्य मोबदला मिळवून देता येणे तसेच त्यांच्या गुंतवणुकीच्या मूल्यात वाढ करणे शक्य होते. त्यामुळे सद्य परिस्थितीमध्ये भारतामध्ये म्युच्युअल फंडच्या विस्ताराला खूप वाव असल्याचे दिसून येते.

### म्युच्युअल फंड – उत्क्रांती व विकास

म्युच्युअल फंडच्या उत्क्रांतीचे मूळ हे सन १८०० मध्ये स्कोटीश आणि ब्रिटीश गुंतवणूकदारांनी पश्चिम अमेरिकेत केलेल्या गुंतवणुकीत तसेच १९६० साली जपानमध्ये जागतिक रोखासंग्रह गुंतवणूकदारांनी केलेल्या गुंतवणुकीत सापडते. प्रारंभी १८२२ मध्ये नेदरलँड मधील किंग विल्यमने रॉयल्टीच्या स्वरूपात गुंतवणुकीचा पर्याय लोकांसाठी खुला केला. बंदिस्त निधीच्या स्वरूपात गुंतवणुकीसाठी हा एक सुलभ पर्याय होता. समान गुंतवणूक उद्दिष्टे असलेले गुंतवणूकदार, गुंतवणूक दारांचे गट व गुंतवणूक संस्था निधीचे योग्य व्यवस्थापन

कार्याबरोबरच गुंतवणूकही करत असत. हे व्यावसायिक निधी व्यवस्थापक ही रक्कम विविध रोख्यांमध्ये गुंतवून नंतर त्यापासून मिळणाऱ्या नफ्याची रक्कम ही त्या निधीच्या सदस्यांमध्ये वाटप करीत असत. म्युच्युअल फंड ही संकल्पना युरोपमध्ये मोठ्या प्रमाणात विस्तारली आणि त्यानंतर १८९३ मध्ये पहिला अमेरिकन निधी सुरू केला. या पद्धतीचा संपूर्ण जगामध्ये वेगाने विस्तार झाला. परंतु भारतामध्ये ही योजना सुरू होण्यास १९६० साल उजाडले. सध्या भारतीय बाजारात विविध प्रकारच्या १०० पेक्षा जास्त योजना असून दरवर्षी असून नवनवीन योजना सुरू केल्या जातात.

## भारतातील म्युच्युअल फंडचा विकास

भारतामध्ये १९६३ मध्ये युनिट ट्रस्ट ऑफ इंडिया (UTI) च्या स्थापनेपासून म्युच्युअल फंडाची सुरुवात झाली. सुरुवातीला वाढीचा वेग खूप कमी होता. परंतु १९८७ पासून UTI व्यतिरिक्त इतर संस्थांनी या व्यवसायात पाऊल टाकले तेव्हापासून म्युच्युअल फंडाच्या विकासाचा वेग वाढल्याचे दिसून येते. अलीकडच्या काही दशकांमध्ये मात्र म्युच्युअल फंडाची संख्यात्मक आणि गुणात्मक वाढ मोठ्या प्रमाणात झाली आहे. सुरुवातीला UTI ची मक्तेदारी असण्याच्या काळात या निधीच्या माध्यमातून व्यवस्थापित केलेली मालमत्ता ६७ द.ल. इतकी होती. परंतु यामध्ये खाजगी क्षेत्राचा प्रवेश झाल्यापासून मार्च २००३ मध्ये ही रक्कम ४७० द.ल. तर एप्रिल २००४ पर्यंत त्यामध्ये १५४० द.ल. इतकी प्रचंड वाढ झाली आहे. म्युच्युअल फंड विकासाच्या विविध अवस्था विचारात घेतल्यास त्याचे प्रमुख चार टप्पे केले जातात. ते थोडक्यात स्पष्ट केले आहेत.

१. पहिला टप्पा (१९६४-१९८७) : सन १९६३ मध्ये भारतीय संसदेने केलेल्या कायद्यानुसार युनिट ट्रस्ट ऑफ इंडियाच्या रूपाने भारतात पहिला म्युच्युअल फंड स्थापन झाला. UTI ची स्थापना RBI द्वारे केली असून त्याचे नियंत्रण व नियमन देखील RBI कडेच आहे. सन १९७८ मध्ये UTI हे RBI पासून वेगळे करण्यात आले असून सध्या ते IDBI च्या नियंत्रणाखाली व नियमनाखाली आहे. सन १९६४ मध्ये UTI ने पहिली गुंतवणूक योजना सुरू केली. १९८८ च्या अखेरपर्यंत UTI च्या माध्यमातून ९७०० कोटी रु. मालमत्तेचे व्यवस्थापन केले जाऊ लागले.

२. **दुसरा टप्पा – सार्वजनिक क्षेत्रात म्युच्युअल फंडची सुरुवात (१९८७-९३)** : या कालावधीमध्ये यु.टी.आय. व्यतिरिक्त इतर म्युच्युअल फंडाची सुरुवात झाली. डिसेंबर १९८७ मध्ये सर्वप्रथम SBI म्युच्युंल फंड, कॅनबँक म्युच्युअल फंड द्वारे सुरू केला. त्यानंतर ऑगस्ट १९८९ मध्ये पंजाब नॅशनल बँक, नोव्हेंबर १९८९ मध्ये इंडियन बँक, जून १९९० मध्ये बँक ऑफ इंडिया, ऑक्टोबर १९९२ मध्ये बँक ऑफ बडोदा, १९८९ व १९९० मध्ये अनुक्रमे LIC व GIC यांनी सार्वजनिक क्षेत्रातील म्युच्युअल फंड योजना सुरू केली. सन १९९३ च्या अखेरीस या सर्व म्युच्युअल फंडाच्या माध्यमातून व्यवस्थापित केल्या जाणाऱ्या मालमत्तेची एकूण रक्कम रु. ४७००४ कोटी इतकी होती.

३. **तिसरा टप्पा** : खाजगी क्षेत्रामध्ये म्युच्युअल फंड योजना सुरू केल्यामुळे म्युच्युअल फंड क्षेत्रात नवीन युगाची सुरुवात झाली. त्यामुळे भारतातील गुंतवणूक दारांना गुंतवणुकीच्या विविध सुविधा उपलब्ध

झाल्यामुळे गुंतवणुकीसाठी अधिक वाव निर्माण झाला. १९९३ साली प्रथमच म्युच्युअल फंड नियंत्रणा व्यवस्था निर्माण करण्यात आली आणि UTI व्यतिरिक्त इतर सर्व म्युच्युअल फंड या यंत्रणेमार्फत व्यवस्थापि केले जाऊ लागले. त्यानुसार जुलै १९९३ मध्ये कोठारी पायोनिअर या खाजगी क्षेत्रातील पहिल्या म्युच्यु फंडची नोंदणी करण्यात आली. नंतर हा फंड फ्रँकलीन टेंपलेटोन यामध्ये विलीन करण्यात आला. सन १९ च्या सेबीच्या म्युच्युअल फंड नियमावलीला पर्यायी असा सर्वसमावेशक व सुधारित म्युच्युअल फंड नियं कायदा १९९६ अस्तित्वात आला. सध्या भारतातील म्युच्युअल फंडचे नियंत्रण सेबी कायदा १९९६ नुसार के जाते.

जानेवारी २००३ पर्यंत भारतात ३३ म्युच्युअल फंड होते व त्यांची एकूण मालमत्ता रुपये १२१८०५ इत होती. केवळ UTI च्या माध्यमातून व्यवस्थापित केल्या जाणाऱ्या मालमत्तेची एकूण किंमत ४४५४१ कोटी रु इतकी होती.

४. **चौथा टप्पा (फेब्रुवारी २००३ पासून पुढे)** : या टप्प्यामध्ये UTI या सार्वजनिक क्षेत्रामध्ये का करत असलेल्या म्युच्युअल फंडला विभाजनाच्या कटू प्रसंगाला सामोरे जावे लागले. UTI चे विभाजन हो दोन वेगळ्या संस्था अस्तित्वात आल्या. त्यामध्ये जानेवारी २००३ मध्ये UTI ची मालमत्ता २९८३५ को रु. इतकी होती. तर UTI म्युच्युअल फंड लि. ही SBI, PNB, BOB, LIC यांच्यामार्फत चालविली जा तसेच सेबीकडे नोंदणीकृत असून म्युच्युअल फंड कायद्याच्या अधीन राहून कार्य करते. सन २००० म UTI चे विभाजनावेळी या कंपनीच्या माध्यमातून व्यवस्थापित केल्या जाणाऱ्या मालमत्तेचे मूल्य रु. ७६० कोटी इतके होते. सप्टेंबर २००४ च्या आकडेवारीनुसार, भारतात एकूण २९ फंडस्, ४२१ विविध योजना अ व्यवस्थापित केल्या जाणाऱ्या मालमत्तेचे मूल्य रु. २५३१०८ कोटी इतके होते.

### म्युच्युअल फंडाचे प्रकार

भारतातील गुंतवणुकीच्या वित्तिय स्थितीनुसार जोखीम, सहनशीलता व अपेक्षित परताव्यानुसार म्युच्यु फंडाचे विविध प्रकार आढळतात. म्युच्युअल फंडाच्या रचनेनुसार, गुंतवणुकीच्या उद्दिष्टांनुसार आणि बाबींवर आधारित असे विविध प्रकार भारतात अस्तित्वात आहेत ते खालीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

१. **खुला निधी** : या प्रकारच्या निधीमध्ये गुंतवणूकदार केव्हाही आणि कितीही प्रमाणात गुंतवणूक शकतात. या प्रकारच्या निधीमध्ये किती गुंतवणूक करावी याबाबत कोणतीही मर्यादा नसते. एकूण मालमत्ते एकूण मूल्यावर त्याची खरेदी किंमत अवलंबून असते. तसेच मालमत्ता मूल्य हे विविध भागधारकांच्या शेअर्स विभागले जातात.

२. **बंदिस्त निधी** : या प्रकारच्या निधीमध्ये योजनेच्या माध्यमातून संकलित केलेल्या निधीची रक आणि शेअर्सची संख्या ही निश्चित असते. या प्रकारच्या निधीमध्ये, योजनेमध्ये प्रस्तावित असलेल्या योजने अधिक युनिटस् आणता येत नाहीत. निव्वळ मालमत्तेची किंमत ही त्यामध्ये असलेल्या शेअर्ससाठी प्र

असत नाही. अशा निधीचे शेअर्स हे दुय्यम बाजारात रोखे बाजाराच्या माध्यमातून जारी केले जातात व त्याच्या किंमती या निव्वळ मालमत्तेच्या मूल्यापेक्षा कमी किंवा जास्त असतात.

३. **उत्पन्न आधारित निधी** : अशा प्रकारच्या निधीमध्ये गुंतवलेल्या रकमेवर बँकांतील ठेवींपेक्षा जास्त दराने परतावा दिला जातो. परंतु त्याचे मालमत्ता मूल्य कमी असते. अधिक उत्पन्न मिळवून देणाऱ्या अपरिवर्तनीय कर्जरोख्यांसारख्या गुंतवणूक साधनांना या निधीमध्ये अधिक महत्त्व असते.

४. **वाढ आधारीत निधी** : या प्रकारच्या निधीमध्ये केलेल्या गुंतवणुकीवर स्थिर व नियमित उत्पन्न मिळत नाही. परंतु दीर्घ कालावधीमध्ये मालमत्तेच्या मूल्यात वाढ होते.

५. **संतुलित निधी किंवा उत्पन्न आणि वाढ आधारित निधी** : ज्यामध्ये अधिक परतावा मिळण्याची शक्यता आहे अशा कंपन्यांच्या रोख्यामध्ये व समभागामध्ये त्याची समान प्रमाणात विभागणी केली जाते.

६. **क्षेत्र निधी** : परदेशी गुंतवणूकदारांसाठी जे निधी इतर देशांमध्ये चालवले जातात त्यास क्षेत्र निधी असे म्हणतात. अशा प्रकारच्या निधीची वाढ ही प्रामुख्याने अमेरिका व इंग्लंड या देशामध्ये अधिक प्रमाणात झाली आहे.

७. **विशेष निधी किंवा औद्योगिक निधी** : या प्रकारच्या निधीतील रक्कम सिमेंट, ताग, ऊर्जा, कापड इ. सारख्या उद्योगांमध्ये गुंतवली जाते. निधीतील संपूर्ण रक्कम विशिष्ट उद्योगांमध्येच गुंतवली जात असल्याने त्यामध्ये जोखीम जास्त असते. नाणेबाजार निधी हा विशिष्ट निधीचाच एक प्रकार आहे. अशा प्रकारचे निधी केवळ नाणेबाजारातील साधनांमध्येच गुंतवणूक करतात.

८. **कर सूट निधी** : जे गुंतवणूकदार कर कक्षेत येतात अशांना कर सवलत मिळावी यांसाठी असे निधी विकसित केले जातात. उत्पन्न कर कायदा १९६१ मधील सेक्शन ८० नुसार, समभाग संबंधित बचत योजना त्याचबरोबर SBI, PNB, LIC, Can Bank यांचेमार्फत फेब्रुवारी १९९१ पासून सुरू आहेत. उत्पन्न कर कायदा १९६१ नुसार या निधीतील गुंतवणूकीवर गुंतवणूक दाराला रुपये १०००० पर्यंतची करसवलत मिळते.

### म्युच्युअल फंडामधील गुंतवणुकीचे फायदे

भारतामध्ये १९६३ नुसार म्युच्युअल फंडाचा विकास वेगाने झाल्याचे दिसून येते. विविध गुंतवणूकदार उद्योजक व संपूर्ण अर्थव्यवस्था याच्या दृष्टीने म्युच्युअल फंडाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. भारतातील म्युच्युअल फंडाचे फायदे खालीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

१. **व्यावसायिक व्यवस्थापन** : विविध कंपन्यांच्या कामगिरीचा अभ्यास करून, गुंतवणुकीपासून मिळणारे विविध फायदे व त्यामध्ये असलेली जोखीम यांचे विश्लेषण करणारे तज्ञ, अनुभवी व कौशल्यपूर्ण व्यक्तींच्याद्वारे म्युच्युअल फंडाचे व्यवस्थापन केले जात असल्याने विविध गुंतवणूक योजनांच्या माध्यमातून गुंतवणूकदारांची उद्दिष्टे पूर्ण केली जातात.

२. **गुंतवणुकीचे विविधीकरण** : वेगवेगळ्या क्षेत्रातील विविध कंपन्यांच्या विविध प्रकारच्या शेअर्सच्या

किंमतीमध्ये एकाच वेळ घट होत नाही. त्यामुळे या निधीच्या माध्यमातून केलेल्या गुंतवणुकीत खूप कमी जोखीम असते. तसेच वैयक्तिक स्वरूपातील गुंतवणुकीच्या तुलनेत खूप कमी रकमेत गुंतवणुकीचे विविधीकरण करता येते.

**३. सुलभ प्रशासन** : म्युच्युअल फंड मध्ये केल्या जाणाऱ्या व्यवहारांचे कामकाज इलेक्ट्रॉनिक पद्धतीने केले जात असलेने वितरणातील त्रुटी व विलंब, व्यवहार पूर्ण करण्यास होणारा विलंब, सातत्याने दलाल किंवा कंपनीशी संबंधित घटकांचा सातत्याने पाठपुरावा करणे या अनावश्यक बाबी टाळता येतात. त्यामुळे गुंतवणूकदारांचा वेळ व श्रम वाचतात.

**४. अधिक परतावा क्षमता** : विशिष्ट कंपन्यांच्या ठरावीक रोख्यामंध्ये दीर्घ कालावधीसाठी गुंतवणूक केली जात असल्याने या निधीतील गुंतवणुकीवर परताव्याचा अधिक दर मिळतो.

**५. तरलता** : खुल्या निधीमध्ये केलेली गुंतवणूक गुंतवणूक दर कधीही काढून घेऊ शकतात. मालमत्तेच्या मूल्यामध्ये होणाऱ्या वाढीचे फायदे यामध्ये मिळू शकतात. तसेच बंदिस्त निधीमध्ये गुंतवणूकदार प्रचलित किंमतीला आपले रोखे बाजारात विकू शकतात. तसेच यामध्ये पुनर्खरेदीची सुविधा देखील उपलब्ध असते.

**६. पारदर्शकता** : गुंतवणूक दराने निवडलेली गुंतवणूक योजना, गुंतवणुकीचे मूल्य, गुंतवणूक केलेल्या साधनांचा प्रकार, त्याचबरोबर निधी व्यवस्थापकाचे गुंतवणूक धोरण, व्यूहरचना व दृष्टीकोन यांबाबतची सर्व माहिती नियमितपणे मिळत राहते. त्यामुळे म्युच्युअल फंड मधील व्यवहार हे पारदर्शी असतात.

**८. लवचिकता** : निधीद्वारे नियमित गुंतवणूक योजना, नियमित निर्गुंतवणूक योजना, लाभांश पुनर्गुंतवणूक योजना उपलब्ध करून दिल्या जातात. गुंतवणूकदार गरजेनुसार व क्षमतेनुसार यापैकी कोणत्याही योजनेत गुंतवणूक करू शकतात किंवा केलेली गुंतवणूक काढून घेऊ शकतात.

**९. गुंतवणूक योजनांची निवड** : म्युच्युअल फंड आजीवन किंवा दीर्घ कालावधीसाठी विविध प्रकारच्या कुटुंब गुंतवणूक योजना उपलब्ध करून देतात. त्यामधील कोणतीही गुंतवणूक योजना निवडण्याचे स्वातंत्र्य गुंतवणूकदारांना असते.

**१०. सुनियंत्रित कार्य** : सर्वच म्युच्युअल फंड हे भांडवली बाजाराचे नियंत्रण करणाऱ्या सेबीकडे नोंदणीकृत असतात. तसेच गुंतवणूकदारांचे हित संवर्धन करण्यासाठी आलेल्या नियमांचे काटेकोरपणे पालन करतात. म्युच्युअल फंडाचे कार्य सेबी द्वारे नियंत्रित केले जाते.

**स्वयंअध्ययनासाठी प्रश्न १**

**खालीलपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१. बंदिस्त निधीमध्ये ........ निश्चित असते.

(अ) वितरकांची संख्या (ब) मालमत्तेचे निव्वळ मूल्य

(क) परताव्याचा दर (ड) निधीचे आकारमान

२. .......... प्रकारच्या निधीतील गुंतवणुकीमध्ये जोखीम अधिक असते.

(अ) समभाग निधी (ब) बंदिस्त निधी

(क) खुला निधी (ड) समतोल निधी

३. म्युच्युअल फंडच्या मालमत्तेचे निव्वळ मूल्य हे .......... .

(अ) कायम स्थिर असते (ब) बाजारातील बदलाप्रमाणे त्यात वाढ किंवा घट होते

(क) कायम वाढते (ड) स्थिर दराने त्यात वाढ होते

४. म्युच्युअल फंड हे.......... च्या मालकीचे असतात.

(अ) सेबी (ब) सरकार (क) गुंतवणूकदार (ड) वरीलपैकी नाही

५. UTI चे पूर्ण रूप .......... हे आहे.

(अ) United Team of Investment (ब) Unit Trust of Investment

(क) Unit Trust of India (ड) वरीलपैकी सर्व

## १.१.३ भारतातील कर्ज कंपन्या

कर्ज किंवा अग्रीमे देण्याच्या कार्याबरोबरच जी कंपनी सार्वजनिक वित्तपुरवठा करण्याच्या कार्यात गुंतलेली असते त्यास कर्ज कंपनी किंवा वित्त कंपनी असे म्हटले जाते. मात्र ही कंपनी भाडेपट्टी कराराचे व्यवहार करत नाही. कर्ज कंपन्या या व्यक्तींच्या किंवा त्यांच्या ग्राहकांच्या कर्जाच्या मागणीनुसार व पसंतीनुसार कर्जाचा पुरवठा करतात. या कर्ज कंपन्या विविध प्रकारच्या कर्जाचा पुरवठा करण्याचे कार्य करतात. त्यामध्ये प्रामुख्याने औद्योगिक कर्ज,. मुदत कर्ज, सुरक्षित कर्ज, असुरक्षित कर्ज तसेच शेती कर्ज इ. प्रकारच्या कर्जाचा समावेश होतो.

कर्ज कंपन्या या लहान प्रमाणात व्यवहार करणाऱ्या भागीदारी संस्था असतात. त्या लोकांकडून अधिक व्याजदर देण्याचे आमीष दाखवून ठेवी संकलित करतात. आणि अशा ठेवींच्या माध्यमातून उपलब्ध झालेल्या निधीमधून घाऊक व किरकोळ विक्रेते, लहान कंपन्या, स्वयंरोजगार करणाऱ्या व्यक्ती इ. ना कर्जपुरवठा केला जातो. परंतु या कर्जावर आकारला जाणारा व्याजदर मात्र अधिक असतो.

### १.१.३.१ व्याख्या

ज्या कंपनीचा कर्जपुरवठा करणे हा मुख्य व्यवसाय असतो त्यास कर्ज कंपनी असे म्हटले जाते.

किंवा

जी कंपनी कर्ज व अग्रीमे देण्याचे कार्य करते त्यांना कर्ज कंपनी असे म्हटले जाते.

कर्ज कंपनी ही बँकेतर वित्तीय संस्थेचाच एक प्रकार आहे. बँकेतर वित्तीय संस्थाप्रमाणेच याही कंपन्यां कार्य चालते. भारतातील बँकिंग कंपनी कायदा १९५६ च्या आधारेच या कंपन्यांना कर्जपुरवठा करण्या तसेच बँकिंग व्यवसाय करण्याची परवानगी दिली जाते. १९५६ च्या कंपनी कायद्यात केलेल्या तरतुदीनुसार प्रकारचा व्यवसाय करणाऱ्या भारतीय कंपनीला २ कोटी रु. तर विदेशी कंपनीला ५ कोटी रु. इतकी भांडव मर्यादा ठरवून दिली आहे. भारतीय मध्यवर्ती बँकेच्या १९३४ च्या कायद्यातील तरतुदीस अनुसरून कर्ज कंपन्यां बँकेतर वित्तीय संस्था म्हणून बँक व्यवसाय करण्याचे मान्यतापत्र देते.

### भारतातील कर्ज कंपन्यांची कार्ये

**१. ठेवी गोळा करणे :** व्यापारी बँकांप्रमाणेच या कर्जकंपन्या लोकांकडील ठेवी संकलित करण्या कार्य करतात. या कर्ज कंपन्यांचे भांडवल कमी असते. त्यामुळे ठेवींच्या माध्यमातून उपलब्ध झालेला निधी कर्ज देण्यासाठी वापरतात. या कर्जपुरवठा करणाऱ्या कंपन्यांना व्यापारी बँका व इतर प्रकारच्या वित्तपुरव करणाऱ्या संस्था यांच्याशी स्पर्धा करावी लागते. या वित्त पुरवठा करणाऱ्या कंपन्यांमध्ये ठेवली जाणारी ठे तुलनेने असुरक्षित समजली जाते. त्यामुळे त्यांना आकर्षक व्याजदराचे आमिष दाखवावे लागते. ठेवीदा अधिक व्याजदर देऊन या कंपन्या ठेवी संकलित करतात.

**२. कर्जपुरवठा करणे :** कर्ज पुरवठा कंपन्या विविध उद्दिष्टांनी कर्जपुरवठा करतात. या प्रकारच्या कंप वैयक्तिक स्वरूपाचा उपभोगासाठी कर्जपुरवठा करतात. तसेच व्यावसायिक स्वरूपाचा व व्यावसा कारणांसाठी देखील कर्ज पुरवठा केला जातो. घाऊक व किरकोळ विक्रेत्यांना अशा कर्ज कंपन्यांच्या माध्यमा कर्ज पुरवठा केला जातो. या कंपन्या कर्जपुरवठा करत असताना आवश्यक कागदपत्रांची काटेकोरपणे तपास करत नाहीत. ज्यांना व्यापारी बँकां, विकास बँका, राष्ट्रीयीकृत बँका व सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनी क नाकारले आहे अशांना या कंपन्यांकडून कर्जपुरवठा केला जातो. या कंपन्यांकडून केल्या जाणा कर्जपुरवठ्यात जोखमीचे प्रमाण अधिक असल्याने या कंपन्या इतर वित्तीय संस्थांपेक्षा अधिक दराने व्या आकारणी करतात. त्यामुळे या कंपन्यांमार्फत केला जाणारा वित्तपुरवठा महाग असतो.

**३. कर्जाचे नूतनीकरण करणे :** या कंपन्या अल्प मुदतीचा कर्जपुरवठा करतात. हा कर्ज पुरवठा करता कर्ज दाराची कर्ज परतफेड क्षमता विचारात घेतली जात नाही तसेच याच्यावरील व्याजाचे दर अधिक असल्या दिलेल्या मुदतीत कर्जाची परतफेड कर्जदारांकडून होत नाही. त्यामुळे थकीत कर्जाच्या रकमेत वाढ होण्या धोका अधिक असतो. त्यावर उपाय म्हणून या कंपन्या कर्जदाराने घेतलेले कर्ज व त्यावरील व्याज इतक्या रकमे कर्ज नव्याने मंजूर केले जाते व त्यातून अगोदर दिलेल्या कर्जाची मुदत व व्याज रक्कम यांची परतफेड केल्या कागदोपत्री दाखवतात. परंतु अशा व्यवहारांमुळे कर्जामधील जोखीम कमी न होता ती वाढण्याचाच धो अधिक असतो.

**४. उपभोगासाठी कर्जपुरवठा करणे :** या कंपन्या उपभोगासाठी देखील कर्जपुरवठा करतात. त्या अर्थव्यवस्थेत उपभोगाला चालना मिळते. लोकांचे उपभोगाचे प्रमाण वाढल्यामुळे प्रभावी मागणी देखील व

परंतु बहुतांश वेळा अशा कर्जपुरवठ्यामुळे अनावश्यक खर्चात वाढ होऊन किंमतवाढ घडून येते व महागाई वाढीस चालना मिळते.

५. **मुदती ठेवी स्वीकारणे :** या कंपन्यांना मागणी ठेवी स्वीकारता येत नाहीत. त्यामुळे या कंपन्या अधिक कालावधीसाठी मुदत ठेवी स्वीकारतात. त्यामुळे त्यांना कर्जव्यवहारासाठी निधी उपलब्ध होतो.

६. **वित्त पुरवठा विषयक गरजांची पूर्तता करणे :** भारतात विविध क्षेत्रांमध्ये विशिष्ट उद्देशाने कार्य करणाऱ्या विविध कर्ज कंपन्या कार्यरत आहेत. ज्यांना इतर वित्तीय संस्थांकडून कर्ज मिळण्यामध्ये अडचणी येतात त्यांच्या वित्तपुरवठा विषयक गरजा पूर्ण करण्याचे कार्य या कंपन्या करतात. विविध उद्दिष्टांसाठी तात्काळ कर्ज पुरवठा या कंपन्यांद्वारे उपलब्ध करून दिला जातो.

वरील प्रकारची विविध उपयुक्त कार्ये कर्ज कंपन्या करीत असल्या तरी त्यांना विविध प्रकारच्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे.

## कर्ज कंपन्यांच्या समस्या

अर्थव्यवस्थेतील विविध घटकांना कर्जपुरवठा करण्याच्या बाबतीत कर्ज वित्त कंपन्यांचे कार्य उल्लेखनीय आहे. कमी भांडवलामध्ये देखील या कंपन्यांनी कर्ज पुरवठ्याच्यां बाबतीत महत्त्वाची भूमिका बजावली आहे. वेगवेगळ्या गटातील लोकांच्या अर्थ पुरवठा विषयक गरजा या कंपन्यांच्या माध्यमातून पूर्ण केल्या जातात. परंतु ठेवी गोळा करण्याच्या बाबतीत मात्र या कंपन्यांची कामगिरी फारशी समाधानकारक नसल्याचे दिसून येते. कारण त्यांना सार्वजनिक क्षेत्रातील तसेच खाजगी क्षेत्रातील व्यापारी बँकांशी स्पर्धा करावी लागते. या संस्था भारतीय वित्त व्यवस्थेतील महत्त्वाचा घटक आहेत. परंतु त्यांना विविध अडचणींचा सामना करावा लागत आहे. वास्तविक पाहता या कंपन्यांच्या कार्य पद्धतीतच अनेक दोष आहेत. त्यामुळे त्यांच्या समस्यांमध्ये आणखीनच भर पडते. या समस्या पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

१. **किमान भांडवल मर्यादा :** कोणत्याही कंपनीला कर्ज कंपनी म्हणून मान्यता मिळविण्यासाठी किमान २ कोटी रु. अधिकृत भांडवलाची अट घालण्यात आली आहे. त्यामुळे लहान कर्ज कंपन्यांच्या बाबतीत अडचण निर्माण होते. मूलतः या कंपन्यांकडील भांडवलाचे प्रमाण कमी असते. त्यात किमान भांडवलाच्या अटीमुळे लहान कंपन्यांना आपले कार्य बंद करावे लागते. त्यामुळे मोठ्या कर्ज कंपन्यांचा अधिक फायदा होऊन त्यांचाच अधिक विकास झाल्याचे दिसून येते.

२. **जाचक अटी :** या कंपन्यांचा कारभार अधिक पारदर्शीपणे केला जावा यासाठी केल्या जाणाऱ्या, व्यवहारांची माहिती नियंत पाने सादर करावी लागते. त्यामध्ये ठेवींची रक्कम, व्याजदर, मुदत, कर्जाऊ दिलेली रक्कम इ. चा समावेश होतो. त्यामुळे अधिक कार्यक्षमता यामध्येच खर्च होते.

३. **विशिष्ट औद्योगिक घराण्यांचा अधिक प्रभाव :** भारतात विविध प्रकारच्या कर्ज देणाऱ्या काही कंपन्या आहेत. परंतु त्यामध्ये ठरावीक कंपन्यांचाच अधिक प्रभाव असल्याचे दिसून येते. प्रचंड प्रमाणात

भांडवल असणाऱ्या विविध औद्योगिक घराण्यांनी या व्यवसायात मोठ्या प्रमाणात प्रगती केल्याचे दिसून येते. त्यामुळे ठरावीक औद्योगिक घराण्यांचेच वर्चस्व या व्यवसायात निर्माण झाले आहे. त्याचा प्रतिकूल परिणाम लहान स्वरूपाच्या कर्ज कंपन्यांच्या कार्यावर झाला आहे.

**४. परवाना मिळण्यास विलंब :** कंपनी कायदा १९५६ मध्ये २०१३ साली केलेल्या दुरूस्तीने कंपनी कायदा २०१३ नुसार कर्ज कंपन्यांना बँकेतर वित्तीय संस्था म्हणून मान्यता मिळते. परंतु मध्यवर्ती बँकेकडून हा परवाना मिळविण्यासाठी किमान भांडवल, व्यवहारातील पारदर्शकता तसेच इतर अनेक अटींचे पालन करावे लागते. ठरावीक अटींची पूर्तता केल्यानंतरच मध्यवर्ती बँकेकडून हा व्यवसाय करण्यासाठीचे व्यवसाय मान्यता प्रमाणपत्र प्राप्त होते. त्यामुळे कंपनीचे प्रत्यक्ष कार्य सुरू होण्यास विलंब लागतो.

**५. दुहेरी कर्ज पुरवठा :** भारतात कार्य करत असलेल्या विविध कर्ज कंपन्यांमध्ये समन्वय असणे आवश्यक असते. परंतु भारतातील कर्ज कंपन्यांच्या कार्यात समन्वयाचा अभाव असल्याने एकच कर्जदार एकाच मालमत्तेच्या तारणावर एकापेक्षा अधिक कर्ज कंपन्यांकडून कर्ज मिळविण्यास यशस्वी होतो. त्यामुळे कर्जाची वसुली करण्यामध्ये अडचणी निर्माण होतात तसेच कर्ज कंपन्यांचे बुडीत कर्जाचे प्रमाण वाढण्याचा धोका निर्माण होतो.

**६. पुनर्वित्त सेवेचा अभाव :** कर्ज पुरवठ्याचे कार्य करणाऱ्या लहान कर्ज कंपन्यांना पुनर्वित्ताची सुविधा उपलब्ध असत नाही. त्यामुळे पूर्वी वितरित केलेल्या कर्जाची वसुली मुदतीत झाली नाही तर नव्याने कर्ज पुरवठा करण्यासाठी निधी उपलब्ध होत नाही. बँकांनी त्यांना दिलेल्या कर्जाच्या आधारे पुनर्वित्ताची सोय उपलब्ध असते. परंतु कर्ज कंपन्यांच्या बाबतीत तशी सोय उपलब्ध नसल्याने भारतात लहान कर्ज कंपन्यांचा पुरेसा विकास झाला नाही.

**७. फसवणुकीचे वाढते प्रमाण :** कर्ज पुरवठ्याच्या कार्यात भारतातील कर्ज कंपन्यांचे योगदान खूप मोठे आहे. या कंपन्या ठेवींवर अधिक व्याजदर देतात. परंतु बोगस कंपन्या ठेवीदारांना अधिक व्याजदराचे आमीष दाखवून मोठ्या प्रमाणात ठेवी गोळा करतात व काही काळाने ठेवीदारांचे पैसे परत न करता पलायन करतात. त्यामुळे ठेवीदारांचे नुकसान होते.

**८. विश्वासार्हता कमी :** दिवसेंदिवस बोगस कर्ज कंपन्यांचे अनेक अनेक घोटाळे समाजासमोर येत आहेत. त्यातून ठेवीदारांना नुकसान सहन करावे लागते. अशा फसवणूक करणाऱ्या बोगस कर्ज कंपन्यांवर योग्य नियंत्रण नसल्यामुळे त्यांचे फावते. त्यामुळे कर्ज कंपन्यांची विश्वासार्हता दिवसेंदिवस कमी होत आहे.

वरील अनेक प्रकारच्या समस्या तसेच कार्य पद्धतीतील दोष भारतातील कर्ज कंपन्यांच्या बाबतीत दिसून येतात.

## २.२.३ स्वयं अध्ययन प्रश्न

१. भारतातील कर्ज कंपन्या हा .......... चा एक भाग आहेत.

(अ) व्यापारी बँका (ब) राष्ट्रीयीकृत बँका

(क) बँकेतर वित्तीय संस्था (ड) सरकारी बँका

२. खालीलपैकी .......... या संस्थांचा व्याजदर सर्वात जास्त असतो.

(अ) गुंतवणूक कंपन्या (ब) म्युच्युअल फंड

(क) मर्चंट बँका (ड) कर्ज कंपन्या

३. विदेशी कर्ज कंपन्यांसाठी किमान भांडवलाची मर्यादा .......... इतकी आहे.

(अ) ३ कोटी (ब) पन्नास लाख

(क) ५ कोटी (ड) दोन कोटी

४. भारतातील कर्ज कंपन्या या प्रामुख्याने .......... ठेवी स्वीकारतात.

(अ) आवर्ती (ब) मागणी (क) मुदत (ड) बचत

५. भारतातील कर्ज कंपन्यांना व्यवसाय करण्याची परवानगी खालीलपैकी .......... या कायद्यातील तरतुदीनुसार दिली जाते.

(अ) आर.बी.आय. कायदा १९३४ (ब) आर.बी.आय. राष्ट्रीयीकरण कायदा १९४९

(क) सेबी कायदा १९८८ (ड) कंपनी कायदा १९५६

## २.२.४ भारतीय आयात निर्यात बँक

**स्थापनेची पार्श्वभूमी :**

भारतीय आयात-निर्यात बँकेची (EXIM Bank of India) स्थापना सन १९८२ मध्ये करण्यात आली. आयात-निर्यात कायदा १९८१ नुसार या बँकेची स्थापना करण्यात आली असून १ जानेवारी, १९८२ पासून या बँकेचे प्रत्यक्ष कार्य सुरू झाले. ही बँक म्हणजे भारतातील सर्वोच्च निर्यात प्रोत्साहन व पायाभूत सुविधा केंद्र म्हणून कार्य करते. निर्यात वाढीसाठी विविध कार्यक्रम आणि धोरणे यांच्या माध्यमातून निर्यात क्षेत्राला प्रोत्साहन देणारे व विकास घडवून आणण्यासाठी मुख्य संस्था म्हणून ही संस्था कार्य करते. देशातील निर्यातदारांना आणि परदेशातील आयातदारांना वित्त पुरवठा, प्रोत्साहनात्मक सल्ला व सेवा पुरवठा करणारी यंत्रणा, निर्यातीसाठी प्रोत्साहन व पायाभूत सुविधांसाठी पुरवठा करणारी यंत्रणा यांच्या माध्यमातून देशाच्या आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये या बँकेचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.

राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर भारतीय व भारताबाहेरील आयातदारांना तसेच जागतिक बँकेच्या संयुक्त साहसी उपक्रमांना साहाय्य करणारी संस्था म्हणून या बँकेला मान्यता मिळाली आहे.

निर्यातीसाठी व निर्यातदारांसाठी मध्यम व दीर्घमुदतीचा वित्तपुरवठा करण्यासाठी एक विशेष वित्तीय संस्था स्थापन करावी अशी शिफारस पी. सी. अलेक्झांडर (१९७८), टंडन समिती (१९८०) यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या अभ्यासगटाने व विविध वित्तीय समित्यांनी सरकारला केली होती. तसेच निर्यातीसाठी व निर्यातदारांसाठी केल्या जाणाऱ्या अर्थ साहाय्यमध्ये सुलभता यावी व भारतीय निर्यात क्षेत्राला चालना मिळेल यादृष्टीने संभाव्य बदल या समित्यांनी सुचविले होते. विविध समित्यांनी केलेल्या या शिफारशींचा विचार करून भारतीय संसदेने १७ ऑगस्ट १९८१ रोजी एक्झिम बँक कायदा संमत केला. त्यास अनुसरून १ जानेवारी १९८२ पासून भारतीय आयात-निर्यात बँक अस्तित्वात आली. त्यानंतर आय.डी.बी.आय. बँकेच्या विदेशी वित्तपुरवठा शाखेमार्फत एक्झिम बँकेचे निर्यातीसाठीचे पत्रव्यवहार आणि निर्यातीसाठी पतपुरवठा केला जाऊ लागला.

सन १९८२ ला आयात-निर्यात बँक जेंव्हा अस्तित्वात आली, त्यावेळी खाजगी क्षेत्राचा पुरेसा विकास झाला नसल्याने तसेच खाजगी क्षेत्र पुरेसे सक्षम नसल्याने, पतपुरवठा सुविधांमध्ये सुधारणा करणे तसेच कमी विमा हप्त्यांमध्ये निर्यातीसाठी केल्या जाणाऱ्या पतपुरवठ्यातील जोखीम कमी करण्यासाठी विमा सुविधा पुरविण्याची गरज होती. निर्यात पत अनुदानाद्वारे एग्झिम बँकेला इतर देशांच्या निर्यात पतपुरवठा संस्थांशी स्पर्धा करण्यासाठी सक्षम करणे व व्यापार तूट कमी करणे हे या बँकेचे अंतिम उद्दिष्ट आहे. ही बँक पूर्णपणे भारत सरकारच्या मालकीची असून ३१ मार्च २०१६ रोजी बँकेचे वसूल झालेले भांडवल रु.६३,००० कोटी इतके होते.

### २.२.४.२ आयात निर्यात बँकेचे व्यवस्थापन

ही बँक पूर्णपणे सरकारच्या मालकीची असून त्याचे व्यवस्थापन संचालक मंडळामार्फत केले जाते. एग्झिम बँकेच्या दैनंदिन कामकाजाबाबतचे तसेच बँकेची दीर्घकालीन उद्दिष्टे पूर्ण करण्याच्या दृष्टीने आवश्यक असणारे धोरणात्मक निर्णय संचालक मंडळ व अध्यक्ष यांच्यामार्फत घेतले जातात. बँकेच्या संचालक मंडळामध्ये सरकारचे प्रतिनिधी, विकास बँका, मध्यवर्ती बँक, सार्वजनिक कंपनी, आंतरराष्ट्रीय व्यापार क्षेत्रातील अभ्यासक यांचा समावेश असतो. त्यामुळे आंतरराष्ट्रीय व्यापार वृद्धिंगत करणे, विशेषतः देशाच्या निर्यातीत वाढ घडवून आणण्यासाठीचे योग्य निर्णय संचालक मंडळामार्फत घेतले जातात.

**आयात-निर्यात बँकेच्या व्यवस्थापन मंडळाची रचना खालीलप्रमाणे आहे :**

१. संचालक मंडळामध्ये केंद्र सरकारकडून एक अध्यक्ष व एक व्यवस्थापकीय संचालक यांची नेमणूक केली जाते. अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक म्हणून एकाच व्यक्तीची नेमणूक केली जाते किंवा पूर्णवेळ दोन संचालकांची नेमणूक केंद्र सरकार करते.

२. भारतीय मध्यवर्ती बँकेकडून एक संचालक नामनिर्देशित केला जातो.

३. विकास बँकेचा प्रतिनिधी म्हणून एक संचालक नामनिर्देशित केला जातो.

४. कंपनी कायदा-१९५६ मधील सेक्शन ६१७ नुसार सरकारी/सार्वजनिक कंपनी म्हणून निर्यात व पतहमी महामंडळ लि. यांच्याकडून एक संचालक नियुक्त केला जातो.

५. केंद्र सरकारकडून नामनिर्देशित केलेल्या संचालकांची एकूण संख्या १२ पेक्षा जास्त असू नये. त्यामध्ये -

(अ) केंद्र सरकारमधील अधिकाऱ्यांमधून पाच संचालक निवडले जावेत.

(ब) अनुसूचित बँकांचे तीन प्रतिनिधी असावेत.

(क) आयात-निर्यात क्षेत्रात, वित्तीय क्षेत्रात काम करण्याचा किंवा व्यवसाय करण्याचा दीर्घ अनुभव असणारे किंवा विशेष ज्ञान असणाऱ्या तज्ञ व्यक्ती यामधून तीन संचालक नियुक्त केले जातात.

केंद्र सरकारकडून नियुक्त केल्या जाणाऱ्या एग्झिम बँकेच्या अध्यक्षांची किंवा व्यवस्थापकीय संचालकांची मुदत ही पाच वर्षांसाठी असते. केंद्र शासनाला त्यांना पुनर्नियुक्ती देण्याचा किंवा मुदतीपूर्वी त्यांना पदावरून दूर करण्याचा अधिकार आहे. केंद्र सरकार व्यतिरिक्त इतर संस्थांनी नामनिर्देशित केलेल्या अर्धवेळ संचालकांचा कार्यकाळ जास्तीत जास्त सहा वर्षांचा असतो. त्यांची पुनर्नियुक्ती करण्याचा किंवा त्यांना संचालक पदावरून दूर करण्याचा अधिकार नामनिर्देशन करणाऱ्या संबंधित प्राधिकरणाला असतो.

### आयात-निर्यात बँकेची कार्ये

एग्झिम बँक कायदा १९८१ यामध्ये निश्चित केलेली आयात-निर्यात बँकेची कार्ये खालीलप्रमाणे आहेत.

भारतातील अनुसूचित बँका तसेच इतर वित्तीय संस्था व केंद्र सरकारच्या अधिकृत राजपत्रामध्ये सूचित केलेल्या इतर वित्तीय संस्था व बँका यांना आयात किंवा निर्यातीच्या उद्देशाने कर्जासाठी पुनर्वित्तपुरवठा करणे तसेच अग्रीमे देणे.

२. ज्या कंपन्या आयात व निर्यात यांसारखी कामे करतात अशा उद्योग संस्थांचे रोखे, शेअर्स, कर्जरोखे व बाँडस् जारी करणे व विक्रीची हमी देणे.

३. भारतात किंवा भारताबाहेर सरकारच्या रोख्यांचा लिलाव करणे किंवा हमी देणे. तसेच बँका वित्तीय संस्था व सरकार यांच्या वतीने अशा व्यवहारांमध्ये सहभागी होणे.

४. व्यापारी विनिमय पत्रे व वचनपत्रे यांचा स्वीकार करणे, संकलन करणे, वटवणूक व पुनर्वटवणूक करणे, त्यांची खरेदी-विक्री करणे व भारतातील व भारताबाहेरील व्यवहार वाढविणे तसेच या विनिमय पत्रांवर व व्यापारी पत्रांवर कर्जे व अग्रीमे देणे.

५. पतपत्रे जारी करणे, मंजुरी देणे, सुरू करणे, निश्चिती करणे व त्यांचे पृष्ठांकन करणे तसेच त्याद्वारे व इतर कागद पत्रांच्या साहाय्याने बिले गोळा करणे व व्यवहार करणे.

६. आयात-निर्यात व्यापाराच्या उद्देशाने विदेशी सरकार, वित्तीय संस्था किंवा एखादी परकीय व्यक्ती यांना पतपुरवठा करणे.

७. भारताबाहेर भारतीय संयुक्त साहसी भांडवलासाठी कर्जे आणि अग्रीमे देणे.

८. भारताबाहेरील कोणत्याही संयुक्त साहसी उपक्रमांमध्ये समभाग असलेल्या कोणत्याही भारतीय व्यक्तींना कर्ज आणि अग्रीमे देणे.

९. भाडेपट्टी करारावर उपकरणे व साधनसामग्री यांची आयात व निर्यात करण्यासाठी वित्तपुरवठा करणे.

१०. विकास बँका व कोणत्याही देशाची आयात-निर्यात यांच्या रोखे, शेअर्स, कर्जरोखे व बाँडस् जारी करणे, नोंदणी करणे, खरेदी करणे किंवा गुंतवणूक करणे.

११. परकीय व्यवहारांची पूर्तता करण्यासाठी आवश्यकता असल्यास अशा व्यवहारांमध्ये सहभाग घेणे तसेच खरेदी-विक्री कार्य करणे.

१२. भारतातील व भारताबाहेरील कोणत्याही शाखेत खाते उघडणे किंवा एखाद्या संस्थेबरोबर व्यवस्थापनात सहभागी होणे किंवा संबंधीत कार्ये करण्यासाठी मध्यस्थ म्हणून कार्य करणे.

१३. कर्ज व अग्रीमे यांच्या मंजुरीसाठी संबंधित असलेली साधने व कागदपत्रे विचारार्थ पाठविणे.

१४. सहभागी प्रमाणपत्रे जारी करणे.

१५. कर्ज, तारण व इतर करार हक्कांची आवश्यकतेनुसार अंमलबजावणी करण्यासाठी विशिष्ट मर्यादेपर्यंत स्टॉक्स, शेअर्स, बॉण्डस् व कर्जरोखे यांची नोंद करणे तसेच खरेदी करणे.

१६. आंतरराष्ट्रीय व्यापाराला प्रोत्साहन देण्यासाठी व विकासाशी संबंधीत संशोधन, सर्वेक्षण, अर्थ-तांत्रिक व इतर अभ्यास करणे व अशा अभ्यासासाठी आवश्यक असलेला वित्तपुरवठा करणे.

१७. आयात-निर्यात व्यापारासाठी आवश्यक असलेले तांत्रिक, प्रशासकीय आणि वित्तीय साहाय्य पुरविणे.

१८. निर्यात वाढीसाठी योजनांची आखणी व अंमलबजावणीचे नियोजन करणे, प्रोत्साहन देणे, विकास घडवून आणणे आणि वित्तपुरवठा करणे.

१९. बँकेची कार्ये नियमितपणे पार पाडण्यासाठी साहाय्यक संस्थांची स्थापना करणे.

२०. केंद्र सरकार, राज्य सरकार, मध्यवर्ती बँक, विकास बँक किंवा केंद्र सरकारची अधिकृत व्यक्ती यांचा प्रतिनिधी किंवा मध्यस्थ म्हणून कार्य करणे.

२१. आंतरराष्ट्रीय व्यापारासंबंधी पतविषयक व बाजारविषयक माहिती मिळविणे, संकलित करणे, एकत्र करणे व त्यांचा प्रसार करणे.

२२. केंद्र सरकारने मान्यता दिलेले सर्व प्रकारचे व्यवसाय करणे.

२३. सध्या अस्तित्वात असलेल्या कायद्यानुसार त्यांची नेमून दिलेली कार्ये करण्यासाठी, त्यांना देण्यात आलेल्या अधिकारांचा आवश्यकतेनुसार वेळोवेळी परिणामकारकपणे उपयोग करणे तसेच त्यांच्या मालमत्तेची खरेदी किंवा हस्तांतरण करण्यासंबंधी कार्य करणे.

**स्वयंअध्ययनासाठी प्रश्न**

१. भारतीय आयात-निर्यात बँकेची स्थापना ......... च्या कायद्यानुसार करण्यात आली आहे.

(अ) कंपनी कायदा १९५६ (ब) रिझर्व्ह बँक राष्ट्रीयीकरण कायदा १९४९

(क) एग्झिम बँक कायदा १९८१ (ड) सेबी कायदा-१९८२

२. एग्झिम बँक ही .......... च्या मालकीची बँक आहे.

(अ) खाजगी (ब) केंद्र सरकार

(क) राज्य सरकार (ड) विदेशी भांडवलदार

३. एग्झिम बँकेच्या संचालक मंडळात केंद्र सरकारचे ......... संचालक असतात.

(अ) तीन (ब) पाच (क) दोन (ड) एक

४. एग्झिम बँकेचे .......... हे मुख्य उद्दिष्ट आहे.

(अ) प्रत्यक्ष परकीय गुंतवणुकीत वाढ घडवून आणणे

(ब) भारताच्या आयात-निर्यात व्यापारात वाढ घडवून आणणे

(क) देशांतर्गत खाजगी गुंतवणुकीस प्रोत्साहन देणे

(ड) उद्योगक्षेत्राला कर्जपुरवठा करणे.

५. एग्झिम बँकेच्या अध्यक्षाची नियुक्ती .......... कालावधीसाठी केली जाते.

(अ) सहा (ब) तीन (क) पाच (ड) सात

## २.३ सारांश

भारताय विविध वित्तीय संस्था कार्यरत असून स्वातंत्र्योत्तर काळात विशेषतः १९६९ नंतर बँकिंग क्षेत्रामध्ये खाजगी व्यापारी बँकांच्या राष्ट्रीयीकरणानंतर बँकिंग क्षेत्रामध्ये आमूलाग्र बदल झाल्याचे दिसून येते. देशातील खाजगी तसेच सार्वजनिक क्षेत्रातील व्यापारी बँकांचे देशाच्या आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत खूप महत्त्वाचे योगदान आहे. १९९१ नंतर बँकिंग क्षेत्रामध्ये देखील आर्थिक सुधारणांचे वारे वाहू लागले. त्यास अनुसरून

१९९१ व १९९८ साली एम. नरसिंहम यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या बँकिंग सुधारणा समितीने अनेक महत्त्वाच्या शिफारशी केंद्र सरकारला केल्या व त्यानंतर बँकाबरोबर इतर वित्तीय संस्थांचे महत्त्व देखील वाढू लागले. भारतामध्ये अनेक वित्तीय संस्था कार्यरत आहेत. त्यामध्ये व्यापारी बँका, सहकारी बँका, विकास बँका, वित्तीय महामंडळे, बँकेतर वित्तीय संस्था, गुंतवणूक कंपन्या, आयात-निर्यात बँक इ. चा समावेश होतो. प्रस्तुत प्रकरणात यापैकी काही मोजक्याच वित्तीय संस्थांचे विवेचन केले आहे.

बँकेतर वित्तीय संस्थांना बँक व्यवसाय करण्याचा परवाना दिला जात नाही. परंतु बँकेतर संस्था म्हणून त्यांची नोंदणी RBI कडे करावी लागते. भारतात व्यापारी बँका व इतर बँकानंतर बँकेतर वित्तीय संस्थांचे कार्य खूप व्यापक आहे. देशातील उद्योगाला चालना देणे, विविध प्रकारचा कर्जपुरवठा करणे, यामध्ये या बँकांची भूमिका खूप महत्त्वपूर्ण आहे. भारतातील निर्यात व्यापाराला चालना मिळावी, परकीय व्यापार देशाला अनुकूल व्हावा, त्यामध्ये वाढ व्हावी यांसाठी भारतीय आयात-निर्यात बँक १९८२ पासून कार्यरत आहे.

देशातील लोकांकडून बचत गोळा करून ती योग्य ठिकाणी गुंतवणूक करण्याच्या दृष्टीने 'म्युच्युअल फंड' उपयोगाचे ठरतात. त्यामुळे भांडवलदारांना, उद्योगांना निधीची उपलब्धता होते व बचतदारांना, गुंतवणूकदारांना त्यांच्या गुंतवणुकीपासून योग्य परतावा मिळतो. त्यामुळे बचत व गुंतवणूकीस चालना मिळते.

बँकेतर वित्तीय संस्थांचा एक भाग किंवा प्रकार म्हणून 'कर्ज कंपन्या' कार्य करताना दिसून येतात. बँकांच्या वित्तीय सेवांपासून वंचित असलेल्या गरजू लोकांना वित्तपुरवठा करण्याचे काम या कर्ज कंपन्यांच्या माध्यमातून केले जाते. त्यामुळे आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत या कर्ज कंपन्या देखील महत्त्वाची भूमिका पार पाडत असल्याचे दिसून येते.

वरील सर्व वित्तीय संस्था, देशाच्या आर्थिक विकासात महत्त्वपूर्ण योगदान देत आहेत. तरी त्यांना विविध प्रकारच्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. तसेच त्यांच्या कार्यपद्धतीत काही दोष आहेत. त्यांना विदेशी वित्तीय संस्थांशी स्पर्धा करावी लागत आहे.

## २.४ महत्त्वाच्या संकल्पना

**१. बँकेतर वित्तीय संस्था :** 'ज्या बँका ठेवी स्वीकारण्याचे व कर्ज वितरीत करणे' यांसारखी कामे करतात परंतु त्यांना बँक म्हणून मान्यता मिळालेली नसते अशा वित्तीय संस्थांना बँकेतर वित्तीय संस्था असे म्हटले जाते.

**२. आयात :** कोणत्याही देशाने देशाबाहेरील बाजारपेठेतून किंवा इतर देशांतून केलेली वस्तू व सेवांची खरेदी म्हणजे त्या देशाची आयात होय.

**३. निर्यात :** कोणत्याही देशाने देशाबाहेरील बाजारपेठेत किंवा इतर देशांना विकलेल्या वस्तू व सेवा म्हणजे त्या देशाची निर्यात होय.

४. भाडेपट्टी करार : एखाद्या कंपनीने आपली यंत्रसामग्री व इतर मालमत्ता इतर उद्योग संस्थांना न विकता काही कालावधीसाठी त्याचा पैशाच्या स्वरूपात मोबदला घेऊन उद्योग संस्थांना न विकता काही कालावधीसाठी त्याचा पैशाच्या स्वरूपात मोबदला घेऊन वापरावयास देणे याबाबत केलेला करार म्हणजे भाडेपट्टी करार होय.

५ कर्ज कंपनी : ज्या कंपनीचे कर्जपुरवठा करणे हे प्रमुख कार्य असते त्यास कर्ज कंपनी असे म्हणतात.

## २.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

स्वयं अध्ययन प्रश्न १

प्रश्न : रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडा.

१. (क) २. (ड) ३. (ब) ४. (ब) ५. (ड)

स्वयं अध्ययन प्रश्न २

प्रश्न : रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडा.

१. (ड) २. (अ) ३. (ब) ४. (क) ५. (क)

स्वयं अध्ययन प्रश्न ३

प्रश्न : रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडा.

१. (क) २. (ड) ३. (क) ४. (क) ५. (ड)

स्वयं अध्ययन प्रश्न ४

प्रश्न : रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडा.

१. (क) २. (ब) ३. (ब) ४. (ब) ५. (क)

## २.६ सरावासाठी प्रश्न

१. बँकेतर वित्तीय संस्था म्हणजे काय ते सांगून भारतातील बँकेतर संस्थांची कामगिरी स्पष्ट करा.

२. भारतातील म्युच्युअल फंडाचे प्रकार कोणकोणते आहेत ?

३. म्युच्युअल फंडातील गुंतवणुकीचे फायदे स्पष्ट करा.

४. भारतीय आयात-निर्यात बँकेची कार्ये कोणकोणती आहेत ?

५. भारतातील कर्ज कंपन्यांचे गुण-दोष स्पष्ट करा.

## २.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


१. डॉ. बी. एच. दामजी, 'बँकिंग आणि वित्तीय बाजारपेठा', फडके प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती, नोव्हेंबर, २००५.

२. डॉ. श्रीधर आत्माराम देशपांडे व डॉ. विनायक श्रीधर देशपांडे, 'वित्तीय संस्था आणि वित्तीय बाजार', हिमालय पब्लिशिंग हाऊस, मुंबई, प्रथम आवृत्ती-२००४.

३. डॉ. कुणाल बडदे आणि डॉ. बी. खटाळ, 'भारतीय बँकिंग आणि वित्तीय प्रणाली', प्रशांत पब्लिकेशन्स.

४. डॉ. मुकुंद महाजन, 'भारतातील बँक कायदे आणि व्यवहार', निराली प्रकाशन.


***